# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

## दिनांकः16.11.2025 वारःरविवार

---

1. नवी दिल्लीत भारतीय आंतरराष्ट्रीय व्यापार मेळ्यात 'महाराष्ट्र दिन' उत्साहात साजरा
2. अमेरिकेने अन्नपदार्थ आयातीवरील कर कमी केल्याने महाराष्ट्रातून होणाऱ्या आंबा आणि डाळिंबाच्या निर्यातीला लाभ होणार
3. भारत फ्रान्स - गरुड २५ द्विपक्षीय हवाई सराव आजपासून फ्रान्समध्ये सुरू
4. सिक्कीम मधील डोकलाम आणि चो ला ही पर्यटन स्थळ१५ डिसेंबरपर्यंत पर्यटकांसाठी खुली होणार आणि
5 . देशात काही भागात उद्यापर्यंत थंडीची लाट येण्याची शक्यता

**<u>ममेळा</u>**

नवी दिल्लीत भरलेल्या ४४व्या भारतीय आंतरराष्ट्रीय व्यापार मेळ्यात काल 'महाराष्ट्र दिन' अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. राज्याच्या मातीतील कलांचं मनोहारी दर्शन यावेळी उपस्थितांना घडविण्यात आलं. महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विकास पानसरे यांनी या सोहळ्याचं उद्घाटन केलं. नृत्य दिग्दर्शक संदेश पाटील यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या 'लोकरंग महाराष्ट्राचे' या कार्यक्रमात ५० हून अधिक कलावंतांनी सहभाग घेतला. या रंगारंग कार्यक्रमात बाळ शिवाजी जन्मोत्सव, राज्याभिषेक यांसारख्या ऐतिहासिक क्षणांसह शेतकरी नृत्य, वाघ्या मुरळी, गोंधळ, जोगवा, आदिवासी ठाकर नृत्य, लावणी आणि कोळी नृत्य यांसारख्या विविध लोककलांना रसिकांनी भरभरून प्रतिसाद दिला. कार्यक्रमाची सांगता महाराष्ट्राच्या राज्य गीतानं झाली.

**<u>अमेरिका</u>**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अन्नपदार्थ आयातीवरील कर कमी केले आहेत. यामुळे भारतातून विशेषतः महाराष्ट्रातून होणाऱ्या आंबा आणि डाळिंबाच्या निर्यातीला याचा लाभ होणार आहे. उष्णकटिबंधीय प्रदेशातून येणारी फळं आणि फळांचे रस, चहा आणि मसाले यांच्यावर परस्पर शुल्काचा परिणाम होणार नाही. व्हाईट हाऊसनं नमूद केलेल्या इतर वस्तूंमध्ये कॉफी आणि चहा, कोको, संत्री, टोमॅटो यांचा समावेश आहे. ट्रम्प यांनी यापूर्वी भारतातून होणाऱ्या आयातीवर 25 टक्के परस्पर शुल्क लादलं होतं आणि रशियन तेल खरेदी केल्याबद्दल अतिरिक्त 25 टक्के दंडात्मक शुल्क लावलं होतं. अमेरिकेतील महागाई

रोखण्यासाठी, ट्रम्प यांनी यापूर्वी जेनेरिक औषधांना शुल्कातून सूट दिली त्याचाही भारताला लाभ झाला. अमेरिकेला निर्यात होणाऱ्या निर्धारित जेनेरिक औषधांपैकी 47 टक्के औषधं भारतातून पुरविली जातात.

**<u>संरक्षणगरुडसराव</u>**

भारतीय वायु दल आजपासून फ्रान्समध्ये होणाऱ्या गरुड २५ या आठव्या द्विपक्षीय हवाई सरावामध्ये सहभागी होणार आहे. भारतीय वायु दल २७ नोव्हेंबरपर्यंत फ्रेंच हवाई आणि अंतराळ दलासोबत हा सराव करणार आहे. वास्तववादी वातावरणात प्रत्यक्ष रणनीती आणि प्रक्रिया सुधारणे हे या सरावाचं उद्दीष्ट असल्याचं सरावाचे उद्दिष्ट संरक्षण मंत्रालयाने म्हटलं आहे. दोन्ही वायु दलांमधील संवाद, प्रत्यक्ष कार्यवाहीकरता उपयुक्त अशा ज्ञानाची आणि सर्वोत्तम पद्धतींची देवाणघेवाण करण्याची ही संधी ठरेल असं मंत्रालयानं म्हटलं आहे.

या सरावादरम्यान, भारतीय वायु दलाचं सुखोई -30MKI विमान फ्रेंच लढाऊ विमानांसोबत जटिल हवाई लढाऊ परिस्थितींमध्ये हवेतून हवेत लढाई, हवाई संरक्षण आणि संयुक्त हल्ल्याचा सराव करेल.

**<u>बॉम्बस्फोटछापे</u>**

दिल्लीतील लाल किल्ल्याजवळील पार्किंगमध्ये चालत्या कारच्या स्फोटाचा तपास करण्यासाठी राष्ट्रीय तपास संस्था एनआयए च्या पथकाने बुरहानपूरमधील अनेक ठिकाणी छापे टाकले मात्र अद्याप कोणालाही अटक झाल्याची नोंद नाही. एनआयए पथक दिल्लीतील लाल किल्ल्यावरील स्फोटाशी संबंधित बुरहानपूरमधील एका संशयिताचा शोध घेत आहे. ही संपूर्ण कारवाई ठोस गुप्तचर माहितीवर आधारित असल्यामुळे लवकरच या प्रकरणात मोठं यश मिळण्याची शक्यता आहे.

दरम्यान, दिल्ली बॉम्बस्फोटांनंतर, तपास यंत्रणा इंदूरमधील महू येथील सिद्दीकी कुटुंबावर बारीक लक्ष ठेवून आहेत. गुप्तचर संस्थांनी अल फलाह विद्यापीठाचे कुलगुरू जवाद अहमद सिद्दीकी यांच्याबद्दलही अहवाल मागवला आहे. जवाद यांच्या कुटुंबावर कोट्यवधी रुपयांच्या घोटाळ्याचा आरोप आहे.

**<u>प्रेसदिन</u>**

दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी आज राष्ट्रीय वृत्तपत्र दिनानिमित्त पत्रकारांना शुभेच्छा दिल्या. स्वतंत्र, निर्भय आणि तथ्यांवर आधारित पत्रकारिता ही मजबूत लोकशाहीचा पाया रचते यावर त्यांनी भर दिला आहे. समाजाचा खरा आवाज समोर आणण्यात, लोकांच्या भावना प्रतिबिंबित करण्यात आणि प्रशासन आणि प्रशासनाला जबाबदार धरण्यात माध्यमांची भूमिका महत्त्वपूर्ण आणि प्रेरणादायी असल्याचे त्यांनी नमूद केले.

**<u>भागवत</u>**

पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी आधुनिक जगासाठी सनातन तत्वज्ञान मांडलं आणि ते देशाच्या, काळाच्या आणि परिस्थितीच्या गरजेनुसार एकात्म तत्त्वज्ञान म्हणून सादर केलं, असं मत सरसंघचालक मोहन भागवत यांनी काल जयपूरमध्ये एका कार्यक्रमात व्यक्त केलं. धर्म म्हणजे फक्त धर्म किंवा तत्त्व नसून ते एक अंतिम ध्येय आणि सर्वसमावेशक दृष्टिकोन आहे, असं भागवत म्हणाले.

**<u>सिक्कीमडोकलाम</u>**

सीमा भागातील पर्यटनाचा विस्तार करण्याच्या दिशेने एक मोठं पाऊल उचलत, सिक्कीम सरकारने संवेदनशील डोकलाम आणि चो ला ही पर्यटन स्थळ यंदा १५ डिसेंबरपर्यंत पर्यटकांसाठी खुली केली जाणार आहेत . या निर्णयामुळे, नागरिकांना पहिल्यांदाच या उच्च-सुरक्षा सीमा भागात प्रवेश करण्याची परवानगी दिली जाईल.

**<u>शबरीमला</u>**

केरळमधील प्रसिद्ध शबरीमला अय्यप्पा मंदिर आज मंडल-मकरविलक्कू यात्रेच्या निमित्ताने भाविकांसाठी खुलं होत आहे. मंडलपूजा 27 डिसेंबरला होणार असून मकरविलक्कू उत्सव 14 जानेवारीला आहे. रोज ९० हजार भाविकांना नोंदणीनुसार तसंच आयत्यावेळी रांगेत उभं राहून दर्शन घेता येणार आहे.

**<u>पुतीन</u>**

रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन आणि इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी काल गाझा, इराणचा अणुकार्यक्रम आणि सीरियातील परिस्थिती अशा मध्य पूर्वेकडील विविध घडामोडींवर दूरध्वनीवरून चर्चा केली. युद्धबंदी कराराची अंमलबजावणी, गाझा पट्टीतील कैद्यांची देवाणघेवाण, इराणचा अणुकार्यक्रम, आणि सीरियातील स्थैर्य यावर विचार विनिमय झाल्याचं रशियाच्या परराष्ट्र मंत्रालयानं म्हटलं आहे.

**<u>चिलीनिवडणूक</u>**

चिली मध्ये आज राष्ट्रपतीपदासाठी मतदान होणार असून सत्ताधारी डाव्या विचारसरणीच्या युती विरुद्ध उजव्या विचारसरणीच्या उमेदवारांचा सामना होणार आहे. देशात वाढतता गुन्हेगारी दर, वाढतं स्थलांतर आणि डाव्या विचारसरणीचे अध्यक्ष गॅब्रिएल बोरिक यांच्या धोरणांवरील असंतोष यांचा सामना होत असताना, मतदार दक्षिण अमेरिकन राष्ट्रासाठी वेगळी दिशा निवडण्याची काही विश्लेषकांना अपेक्षा आहे . कोणत्याही उमेदवाराला 50 टक्क्यांपेक्षा जास्त मते मिळाली नाहीत, तर चिलीच्या कायद्यानुसार, हे दोन्ही आघाडीचे उमेदवार १४ डिसेंबर रोजी दुसऱ्यांदा निवडणूक लढवतील.

**<u>मेक्सिकोनिषेध</u>**

हिंसक गुन्हेगारी आणि राष्ट्राध्यक्ष क्लॉडिया शीनबॉम यांच्या सरकारच्या विरोधात काल मेक्सिको शहरामध्ये विविध युवा संघटनांच्या हजारो निदर्शकांनी मोर्चा काढला. काही आठवड्यांपूर्वी उरुपानचे महापौर कार्लोस मांझो यांच्या हत्येसह काही बड्या व्यक्तींच्या हत्येचा निषेध करत कठोर कारवाईची मागणी करण्यात आली. दरम्यान या मोर्चांना आपल्या सरकारला विरोध करणाऱ्या उजव्या विचारसरणीच्या राजकारण्यांनी निधी दिल्याचं राष्ट्राध्यक्ष शीनबॉम यांचं म्हणणं आहे.

**<u>पोटनिवडणूक</u>**

राज्य निवडणूक आयोगाने काल छाननी आणि माघार प्रक्रियेनंतर दिल्ली महानगरपालिकेच्या १२ प्रभागांच्या पोटनिवडणुकांसाठी नामांकन पूर्ण झाल्याची घोषणा केली. आयोगाला १२ रिक्त जागांसाठी १३३ नामांकन अर्ज प्राप्त झाले त्यातले ५३ वैध, तर ८० नामांकन नाकारण्यात आले. ३० नोव्हेंबर रोजी पोटनिवडणुका होणार आहेत.

**<u>जागतिकबॉक्सिंग</u>**

नोएडा इथे आजपासून २० नोव्हेंबरपर्यंत जागतिक मुष्टीयुद्ध चषक स्पर्धेच्या अंतिम फेरीचं आयोजन करण्यात आलं आहे. ब्राझील, पोलंड आणि कझाकस्तानमध्ये यापूर्वी झालेल्या तीन विश्वचषक टप्प्यांनंतर ही अंतिम फेरी आहे. या स्पर्धेत १८ देशांतील १३० मुष्टियोद्धे सहभागी होतील.

**<u>वादळक्लॉडिया</u>**

क्लॉडिया वादळामुळे पोर्तुगाल, स्पेन आणि ब्रिटनमध्ये तीव्र हवामान परिस्थिती निर्माण झाली आहे, ज्यात तीन जणांचा मृत्यू झाला आहे आणि अनेक जण जखमी झाले आहेत. पोर्तुगाल आणि शेजारच्या स्पेनच्या काही भागांमध्ये वादळ क्लॉडियामुळे निर्माण झालेल्या अत्यंत कठीण परिस्थितीचा सामना करावा लागला असून हे वादळ ब्रिटन आणि आयर्लंडच्या काही भागांपर्यंत पोहोचलं आहे. पोर्तुगालमध्ये अल्बुफेरा येथे झालेल्या वादळासह मोठे नुकसान झाले आहे. पोर्तुगीज हवामान सेवेने आयपी एमए ने संपूर्ण अल्गार्वे आणि बेजा आणि सेतुबल जिल्ह्यांना धोक्याचा इशारा दिला आहे . वेल्स आणि इंग्लंडमध्ये मुसळधार पावसात बचाव कार्य सुरू आहे.

हवामान

भारतीय हवामान विभागाने पूर्व राजस्थान, झारखंड आणि उत्तर प्रदेश तसंच मध्य प्रदेश, छत्तीसगड, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्राच्या काही भागात उद्यापर्यंत काही ठिकाणी थंडीची लाट येण्याचा अंदाज वर्तवला आहे. आज तामिळनाडू आणि कराईकलमध्ये मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा केरळ आणि माहे येथील काही ठिकाणी मुसळधार पावसाचा अंदाज आहे.
दरम्यान, दिल्ली-एनसीआरमधील हवेची गुणवत्ता अत्यंत खराब श्रेणीत असून आज सकाळी ७ वाजता हवा गुणवत्ता निर्देशांक ३८५ नोंदवला गेला आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**